MHST200025992020

## वि.दि.दा.क्र.४५३/२०२३ मधील निशाणी क्र.४८ वरील आदेश

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्याचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा खुषखरेदीपत्र करुन मिळणेकामी व निरंतर मनाईसाठी दाखल करण्यात आला आहे. सदर प्रतिवादीविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास दाव्यातील सर्व वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर होण्यास मदत होणार आहे. वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर झाल्यास उभय पक्षकारांदरम्यान असलेला वाद कायमस्वरुपी संपणार आहे. उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. प्रतिवादी हा दि.२५/०३/२०१३ रोजी हजर झालेला आहे. प्रतिवादी याचेविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश दि.११/११/२०२२ रोजी झालेला आहे. सदरचा अर्ज दि.०५/११/२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना उलटतपास नाही आदेश रद्द करण्यासाठी दोन वर्षांचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. सदर विलंबाची भरपाई म्हणुन जास्तीत जास्त खर्चाची रक्कम प्रतिवादीवर लावणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

## आदेश

१) अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी याने खर्चाची रक्कम रुपये २०००/- (रक्कम रुपये दोन हजार फक्त) वादीला दयावेत.

३) वरील खर्चाची पुर्तता झालेनंतर प्रतिवादी याचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द करणेत येतो.

स्थळ : वाई.
दिनांक : १३/०६/२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.